महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग
राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
८ वा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.


संदर्भ क्र. १. वित्त विभाग शा. नि. क्र. विकवि -१२११ / प्र. क्र. २९१ / वि. प्र. ४ दि. १८. ११. २०११

२. कार्यालयीन आदेश क्र. विविआ / म. रा/ पुनर्रचना कक्ष / सुधारित कार्यनिहाय पदे / प्र. क्र. ५८ / ब-४१३ दि. ०८. ०२. २०१२

३. वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विकवि १२१९ / प्र. क्र. ०२ / वि. प्र. - ४, दि २५.०२. २०२०

४. कार्यालयीन आदेश क्र. राज्यकर आयुक्त / २०१६ / विराआ- रासआ नियंत्रण / पुनर्रचना कक्ष / धा. क्र. ८२ दि. १७. ०८. २०२०

५. या कार्यालयाचा आदेश क्र. राज्यकर आयुक्त/२०१६ / विराआ - रासआ नियंत्रण / पुनर्रचना कक्ष / धा. क्र. ८२, दि. ३१.०५.२०२१.

## कार्यालयीन आदेश

आदेश क्र. राज्यकर आयुक्त / २०२१ / विराआ- रासआ नियंत्रण / पुनर्रचना कक्ष / धा.क्र. ८२ दि. 16 JUN 2021

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून प्रशासकीय सोयीसाठी व कार्यालयीन कामकाजाच्या सुलभीकरणासाठी संदर्भीय आदेश क्रमांक ४ व ५ अधिक्रमित करण्यात येऊन पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे:

१) विशेष राज्यकर आयुक्तांचे नियंत्रण पुढील कार्यशाखांवर राहील:-

अ) आस्थापना (Establishment)

ब) प्रशिक्षण

क) जनसंपर्क (PRO)

ड) महाविकास - विशेष राज्यकर आयुक्तांच्या नियंत्रणाखाली श्री. ई. रवींद्रन राज्यकर सहआयुक्त, अन्वेषण-अ हे GSTN शी निगडित बाबी व कामकाज सांभाळतील व सदर कामकाजाकरिता श्री. ई. रवींद्रन राज्यकर सहआयुक्त, अन्वेषण-अ यांचे राज्यकर सहआयुक्त (महाविकास) यांच्यावर नियंत्रण असेल.

महाविकास विभागातील GSTN विषयक बाबी वगळून इतर सर्व बाबी व कामकाजाबाबत राज्यकर सहआयुक्त (महाविकास) यांच्यावर विशेष राज्यकर आयुक्त यांचे नियंत्रण राहील.

इ) दक्षता (Vigilance) - सदर कामकाजाकरिता विशेष राज्यकर आयुक्त मुख्य दक्षता अधिकारी म्हणून कामकाज पाहतील.

२) आर्थिक बुद्धिसंपदा कक्षाच्या कामकाजावरील नियंत्रण -

श्री. अनिल भंडारी, राज्यकर सहआयुक्त, सीमा तपासणी नाके हे मा. राज्यकर आयुक्तांच्या थेट नियंत्रणाखाली आर्थिक बुद्धिसंपदा कक्षाच्या कामकाजाचे नियंत्रण करतील. श्री. अनिल भंडारी, राज्यकर सहआयुक्त, सीमा तपासणी नाके यांचे राज्यकर सहआयुक्त, आर्थिक बुद्धिसंपदा कक्ष यांच्यावर नियंत्रण असेल.

३) अंतर्गत लेखा परीक्षण कार्य शाखेवरील नियंत्रण -

राज्यकर सहआयुक्त, अंतर्गत लेखा परीक्षण यांचेवर प्रशासकीय नियंत्रण श्रीम.संपदा मेहता, राज्यकर सहआयुक्त (अन्वेषण-ब) यांचे राहील. तथापि अंतर्गत लेखा परीक्षण विभागाचे एकंदर कामकाज अंतर्गत लेख परिक्षणाची कार्यालयीन नियम पुस्तिके (Manual) प्रमाणे राहील.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(राजीव कुमार मित्तल)
**राज्यकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत:

१. विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई.
२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई
३. सर्व अपर राज्यकर आयुक्त
५. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी
६. सर्व कार्यासन अधिकारी, आयुक्तांचे कार्यालय.
७. निवडनस्ती
८. स्थळ प्रत.